

# मेट्रो-३ गतिमान

- एल ॲण्ड टी, हिंदुस्तान कन्स्ट्रक्शन, जयकुमार कंपन्यांना कंत्राट
- कुलाबा-वांद्रे-सिप्झच्या कामाला ऑक्टोबरमध्ये सुरुवात
- सात टप्प्यांसाठी ५ कंपन्यांच्या निविदा मंजूर
- प्रकल्प २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन

मुंबई, मंगळवार (विशेष प्रतिनिधी)- उत्तर, दक्षिण मुंबईला जोडणाऱ्या कुलाबा-वांद्रे-सिप्झचा मेट्रो-३ चा प्रकल्प पूर्ण करण्याच्या निविदा आज उघडण्यात आल्या असून पाच कंपन्यांना हे काम देण्यात आले आहे. मुंबईतील पहिल्या वहिल्या भुयारी मेट्रोचे काम मिळालेल्या कंपन्यांमध्ये एल ॲण्ड टी, हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन आणि जयकुमार या कंपन्यांचा समावेश आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने आज मेट्रो-३चे काम या पाच कंपन्यांना देण्यात आल्याचे जाहीर केले असून कॉर्पोरेशनने मेट्रो-३ च्या कामाची विभागणी सात टप्प्यांत वेगवेगळी केली आहे. या मेट्रोच्या कामाला येत्या ऑक्टोबरमध्ये सुरुवात होणार असून हा प्रकल्प २०१९ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मेट्रो-३च्या प्रकल्पांसाठी अंतरराष्ट्रीय निविदा राबविण्यात आल्या होत्या. भारतीय कंपन्यांनी आंतरराष्ट्रीय कंपन्यांना सोबत घेऊन निविदा भरल्या. जपान इंटरनॅशनल कॉर्पोरेशन एजन्सी अर्थात जायका या अंतरराष्ट्रीय कंपनीने मेट्रोच्या बांधकामासाठी कंपन्यांची निवड केली आहे, अशी माहिती मुंबई रेल कॉर्पोरेशनने दिली आहे.

मेट्रा-३ हा पहिला भुयारी मार्ग ३३.५ किलोमीटरचा असून या प्रकल्पासाठी १८ हजार ११५ कोटींचा खर्च येणार आहे. मेट्रो मार्गावरील स्थानकांची संख्या एकूण २७ राहणार असून हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सुमारे १४ लाख प्रवासी प्रवास करतील. यामुळे रस्त्यावरील वाहतूक ३० ते ३५ टक्क्यांनी कमी होणार आहे.

मेट्रो-३ प्रकल्पामुळे उत्तर, दक्षिण प्रकल्पामुळे व्यवसायिक केंद्रे एकमेकाशी जोडली जाणार असून उपनगरीय रेल्वेची सुविधा नसलेल्या काळबादेवी, वरळी, प्रभादेवी या भागातून मेट्रो धावणार आहे. याशिवाय पश्चिम रेल्वेवरील चर्चगेट, मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी आणि मध्य रेल्वेवरील छत्रपती शिवाजी टर्मिनल्स या स्थानकाला मेट्रो जोडणार आहे.

मेट्रो-३ चा पहिला टप्पा कफ परेड ते सीएसटी असा राहणार असून त्याचे काम एल ॲण्ड टीने घेतले आहे. या पहिल्या टप्प्यावर २१४४ कोटी रुपये खर्च येणार आहे. दुसरा टप्पा छत्रपती शिवाजी टर्मिनल्स ते मुंबई सेंट्रल पर्यंत राहणार असून त्यावर २११५ कोटी रुपये खर्च होणार आहेत. हे काम हिंदुस्थान कन्सट्रक्शन कंपनीने घेतले आहे. तिसरा टप्पा मुंबई सेंट्रल ते वरळी, छत्रपती शिवाजी टर्मिनल्स असा राहणार असून त्यावर २४२२ कोटी रुपये खर्च होणार आहेत. हे काम 'सोमा डोगस ऑप्टिकल' या कंपनीने घेतले आहे तर वरळी ते धारावी या चौथ्या टप्प्याचे काम सीईसी या कंपनीने घेतले असून त्यावर २८३० कोटी रुपये खर्च होणार आहे. पाचव्या व सहाव्या टप्प्याचे काम जायका (जयकुमार) ने घेतले असून धारावी ते डोमॅस्टिक एअरपोर्टची मिविदा २३१२ कोटी रुपयाला देण्यात आली असून एअरपोर्ट ते मरोळ नाक्यापर्यंतचे काम १६८४ कोटी रुपयाला देण्यात आले आहे. सातव्या टप्प्यामध्ये मरोळ नाका ते सिप्झ कॉर्नरपर्यंतचे काम एल ॲण्ड टीने घेतले असून त्यावर १६०२ कोटी रुपये खर्च होणार आहेत.